पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी पुणे – १८

माध्यमिक शिक्षण विभाग

६ महिने मुदतीसाठी एकत्रित मानधनावर सहा.शिक्षक

पदवीधर शिक्षक नेमणुक करणेबाबत..

---

जाहिरात क्र. :- 02/2018 दि. 21 /07/2018

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी करारपध्दतीने मनपा माध्यमिक शाळेसाठी मराठी माध्यमाच्या शिक्षकांची करार पध्दतीने मानधन तत्वावर आवश्यकता आहे. त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून अर्ज मागविणेत येत आहे.

१) मराठी माध्यम शैक्षणिक अर्हता – १) बी.ए.बी.एड.

आवश्यक जागा – ५० २) बी.एस्सी.बी.एड.

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा. | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०९ | २४ |

अटी / शर्ती

१) करारपध्दतीने नेमलेल्या शिक्षकांची नेमणुक ही ६ महीने मुदतीचे असेल.त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. अथवा या संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यवसायीक अर्हताविषयक प्रमाणपत्र पदवीका बी.ए.बी.एड. व बी.एस्सी. बी.एड. पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक ,जातीचा दाखला व अनुभव इत्यादी कागदपत्राच्या सत्य प्रती सादर कराव्यात.

३) ज्या दिवशी माध्यमिक शिक्षण विभागास सदर सहा.शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल या संबधीचे सर्व अधिकार माध्यमिक शिक्षण विभागाने राखुन ठेवले आहेत.

४) पात्र उमेदवारांना नेमणुक देताना शिक्षक संख्या कमी – जास्त करण्याचा अधिकार माध्यमिक शिक्षण विभागास राहील.

५) ऊमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात सहा.शिक्षक या पदासाठी अर्ज मा.अति.आयुक्त पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा. सदरचे अर्ज दि. ०६ /०८/२०१८ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत **समक्ष** वेळेत सादर करावेत.

६) निवड झालेल्या ऊमेदवारास रक्कम रूपये ८,०००/- ( अक्षरी आठ हजार रूपये फक्त ) या मानधना व्यतिरीक्त कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही.

७) ऊमेदवारास हजर दिवसाचे एकत्रित मानधन अदा करणेत येईल.

८) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्ज / पात्रता धारण न करणारा,गैरवर्तन करताना

दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास ऊमेदवारी अथवा निवड रद्दबादल तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

९) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही.

१०) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

११) अपुर्ण माहिती व अटिची पुर्तता न करणा-या ऊमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील.अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील.याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) सदरची निवड ( सहा.शिक्षकावर ) ही पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाची आहे. ऊमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद आवश्यकतेनुसार फक्त सहा महिने मुदतीचे राहील.

१३) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये १००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापलिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल.जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचा राहील.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे – १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/01/कावि/671/2018
दि. 21/07/2018

**सही/-**
**शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी पुणे 18**

## ऊमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,

मा.अतिरिक्त आयुक्त,
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे – १८

विषय – सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची नेमणूकीबाबत

संदर्भ – दि. २१ /०७/२०१८ रोजी महानगरपालिकेच्या बेवसाईटवर प्रसिध्द झालेली जाहिरात क्रमांक - ०२ /२०१८

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधनावर माध्यमिक शिक्षण विभाग तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक या पदावर आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडिलांचे/पतीचे नाव

1) संपूर्ण नाव

2) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह –

3) मोबाइल नंबर -

4) जन्मतारीख -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

5) लिंग स्त्री / पुरुष

6) जात प्रवर्ग -

7) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए.बी.एड. | | | |
| २ | बी.एस्सी.बी.एड. | | | |

8) अनुभवाचा तपशील –

________________________________________

________________________________________

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते/करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे एकत्रित मानधन नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासु

स्थळ –

अर्जदाराची सही____________________

दिनांक - /०७/२०१८

अर्जदाराचे नाव____________________

सहपत्रे – अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडत आहे.

पान क्र. - ०१ ते